# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/03/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. भिवापूर :– फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतूर येथे अप. क्र. २४५/२१ कलम ३६३, ३६६(१),३७६ भादवि. सह.क. ३,४ पोक्सो. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील आरोपी नामे– गुणवंता शांताराम जुगनाके, वय २६ वर्ष रा. कोरंबी चंद्रपुर हा फिर्यादीच्या मोठे वडीलांचे घरी नौकर म्हणुन काम करीत होता यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हिला आरोपीने दि १४/०८/२०२१ रोजी ११.०० वा. सुमारास कोणालाही काहीही न सांगता लग्नाचे आमीष दाखवुन पळवुन नेले. तपासा दरम्यान पिडीता हि मिळुन आल्याने पिडीताचे बयानावरून कलम वाढ करून गुन्हा नोद करण्यात आला.

सदर प्रकरणाचे तपास सपोनि. शितल खोब्रागडे पोस्टे भिवापूर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २०/०३/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी जे त्रिवेदी सा. नागपूर यांनी वरील नमुद आरोपीस कलम ३, ४ पोक्सो मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व ५,०००/– रू. दंड, दंड न भरल्यास २ महीने सश्रम कारावास तसेच कलम ३७६ भादवि मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व २०००/–रू दंड व दंड न भरल्यास १ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी गनगने मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सफौ. ८३१ तुलाराम खडसे पो.स्टे. भिवुापर यांनी मदत केली आहे.

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत ०६ किमी. अंतरावर मौजा पिपळा डाग बंगला, कुचक मोहल्ला येथे दिनांक १९/०३/२०२३ चे १९.३० वा. ते २०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– आकाश हरिश्चंद्र तांडेकर, वय ३० वर्षे, मु. पो. सालई, ता. पारशिवणी, ह. मु. देहेगाव रंगारी विठठल रूखमाईच्या मंदीरा जवळ, ता. सावनेर, जि. नागपूर हा देहेगाव रंगारी येथील रहिवासी असून **आरोपी नामे– राष्ट्रपाल उर्फ मंत्री मधुकर मेश्राम वय ३२ वर्षे रा. कुचक मोहल्ला पिपळा डाग बंगला, ता. सावनेर, जि. नागपूर** व जखमी नामे– **विक्की उर्फ विकास देविदास चंद्रीकापुरे वय ३६ रा. कुचक मोहल्ला पिपळा डाग बंगला** हे आजुबाजुला राहतात व नमुद घटना वेळी ठिकाणी आरोपी हा पवन नेवारे यांचे घरी दारू पित असता आरोपीने जखमीला शिवीगाळ करू लागला नंतर पवन नेवारे हा घराचे बाहेर आल्या नंतर पुन्हा आरोपी व जखमी यांच्यात झगडा भांडण झाल्यावर आरोपी याने रागाचे भरात चाकुने जखमीच्या पाठीवर, पोटावर चाकुने मारून गंभिर जखमी करून जिव घेण्याचा प्रयत्न केला जखमी अवस्थेत असलेल्या इसमाला फिर्यादीचे सहकार्याने जखमी यास डॉ. जावेद हॉस्पिटल पिपळा येथे उपचार करीता घेवून गेले. तेथे प्राथमीक उपचार करून पुढील उपचारा करीता मेओ हॉस्पिटल नागपूर येथे नेवून भर्ती करून त्याच्यावर उपचार सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. पिसे मो. नं. ९८८१३७७३४८ हे करीत आहे.

# घरफोडी

**पो.स्टे. कुही**:– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा कुही शिवार येथे दिनांक १९/०३/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक २०/०३/२०२३ चे ११.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे– संपत मोतीराम बावनकुळे, वय ५२ वर्ष, रा. वार्ड क्र. १, कुही, ता. कुही याने ठेक्याने केलेल्या शेतातील स्लॅबचे घरामध्ये १५ दिवसापुर्वी ३५ कट्टे प्रत्येकी ६५ किलो. वजनाचे चना भरून ठेवले होते. नमुद घटना वेळी व ठिकाणी अज्ञात चोराने शेतातील घराचा लॉक तोडुन आत प्रवेश करून घरामधील १५ कट्टे प्रत्येकी ६५ किलो वजनाचे एकुण १० क्विंटल चना प्रत्येकी ४५००/– रू. भावाने किंमती अंदाजे ४५,०००/– रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/३१९ नामदेव पुजारी पो.स्टे. कुही मो. नं. ७७७५८११६१९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**